सत्यमेव जयते

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
**Maharashtra Public Service Commission**

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२७९५९०० फॅक्स : २२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

क्रमांक १४४२(२)(२)/२०१८/तेरा-अ    दिनांक - १४ जानेवारी, २०२०

## घोषणा

## महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब (मुख्य) परीक्षा-२०१८मधील शारीरिक चाचणीसाठी वैद्यकीय कारणास्तव मुदतवाढ देण्याची विनंती केलेल्या उमेदवारांचा शारीरिक चाचणी व मुलाखतीचा कार्यक्रम**

पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा -२०१८मधील शारीरिक चाचणीसाठी वैद्यकीय कारणास्तव मुदतवाढ देण्याची विनंती केलेल्या उमेदवारांचा शारीरिक चाचणी व मुलाखतीचा **कार्यक्रम दिनांक २७ जानेवारी, २०२० ते १ फेब्रुवारी, २०२० या कालावधीत नाशिक येथील पोलीस कवायत मैदान, पोलीस मुख्यालय, सीबीएस जवळ, नाशिक शहर, नाशिक** येथे घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे. याबाबतचा सविस्तर कार्यक्रम आयोगाच्या संकेतस्थळावर नवीन माहिती या सदरात प्रसिध्द करण्यात येईल. त्यानुसार उमेदवारांनी शारीरिक चाचणीकरिता नमूद केलेल्या मैदानावर, विहित दिनांकास वेळेवर उपस्थित रहावे. याबाबतचे शारीरिक चाचणीचे पत्र उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलवर पाठविण्यात येईल.

२. वैद्यकीय कारणास्तव शारीरिक चाचणीसाठी मुदतवाढ देण्यात आलेल्या व या मुदतवाढीच्या कार्यक्रमास उपस्थित राहणा-या उमेदवारांनी शारीरिकदृष्टया तंदुरुस्त असल्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र (Medical Fitness Certificate) त्याचदिवशी सादर करणे अनिवार्य राहील. अन्यथा त्यांची शारीरिक चाचणी घेतली जाणार नाही. प्रस्तुत परीक्षेच्या वैद्यकीय कारणास्तव मुदतवाढीच्या शारीरिक चाचणीचा सदर कार्यक्रम अंतिम असून प्रस्तुत प्रकरणी यानंतर शारीरिक चाचणीकरिता मुदतवाढ मिळण्याबाबतची कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही. याची देखील संबंधित उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

**ठिकाण - मुंबई**    **उपसचिव**

**दिनांक - १४ जानेवारी, २०२०**    **महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई**